Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

Original Article

# कृषी व कृषी पूरक व्यवसायाचे आर्थिक अध्ययन

**प्रा.पंढरी जी.मोरे[1], डॉ. विठ्ठल एन.ठावरी[2]**
[1]प्रिन्सिपल अरुणराव कलोडे महाविद्यालय नागपूर
[2]अर्थशास्त्र विभाग प्रमुख कला व वाणिज्य महाविद्यालय,भिसी त.चिमूर जि.चंद्रपूर
**Email-** more.pandhari@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170912
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 9(A)
Pp.59-64
September 2025

**Submitted:**22 Aug. 2025
**Revised:** 3 Sept. 2025
**Accepted:** 21 Sept. 2025
**Published:** 30 Sept. 2025

***गोषवारा***

*कृषी व्यवसाय हा जगातील अनेक व्यवसायापैकी सर्वात जुना व्यवसाय आहे.कारण मानवाच्या मुलभूत गरजा अन्न,वस्त्र ,निवारा असून मनुष्य वसाहती करून राहत असल्यामुळे तो शेतीकडे विशेष लक्ष देऊ लागला.औद्योगीकीकरणाचा विस्तार आणि विकास आधुनिक काळात मोठ्या प्रमाणात होत असला तरी मात्र आजही कृषी व्यवसाय हा जगातील एक मोठा व्यवसाय म्हणून समजला जातो.कारण जगाच्या एकूण लोकसंखेपैकी १ /३ लोकांचा उदरनिर्वाह हा कृषी व्यवसायावर अवलंबून आहे.शिवाय संपूर्ण जगातील लोकांना अन्नधान्याचा पुरवठा कृषी क्षेत्राच्या माधमातून होतो.त्यापैकी जगातील एकूण उत्पादन होणाऱ्या अन्नात २३ टक्के वाटा हा मासे व मासं यांचा आहे.जगातील लोकसंख्या दरवर्षी वाढत असली तरी मात्र शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या घटकांचा योग्य प्रमाणात वापर करून पुरेसा कृषी कृषी विकास घडवून आणण्यासाठी सर्वच राष्ट्रांचे फार महत्व आहे.जगाच्या उपासमारी,कुपोषण व दारिद्र्य या सारख्या समस्या सोडविण्यासाठी कृषी क्षेत्राची महत्वपूर्ण गरज आहे.तर काही देशांमध्ये लोकांचे कृषी जीवन अशा परिस्थितीत आहे.कारण त्यांचा उदरनिर्वाह हा कृषीवरच अवलंबून आहे. आपल्या अन्न,वस्त्र व निवारा इत्यादी गरजा भागविण्यासाठी लागणारे पदार्थ वनस्पती व प्राणी यांच्या पासून मिळतात.म्हणूनच पिकांबरोबरच गुरे ,कोंबड्या,बकऱ्या,मेंढ्या व मधमाशा पाळणे , रेशमाचे किडे पोसणे ,बागायती करून फळफळावळ काढणे,इत्यादी उद्योगाचीही कृषी पूरक व्यवसायात समावेश होतो.*

**प्रस्तावना**

कृषी भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे.भारताच्या एकूण लोकसंखेपैकी ६५ ते ६७ टक्के लोकसंख्या कृषी व कृषिपूरक व्यवसायावर अवलंबून आहे.राज्यातील सुमारे ५३ टक्के लोकसंख्या उपजीविकेसाठी कृषी व कृषिपूरक व्यवसायावर अवलंबून असल्याने हे क्षेत्र अत्यंत महत्वाचे आहे. हवमानातील बदल ,कमी होत असलेले विहित क्षेत्र ,साधनसामुग्रीवर होणारा जास्त खर्च आणि बाजारभावातील अनिश्चिततायामुळे तोट्यात जाणारा शेती व्यवसाय या बाबी कृषी क्षेत्रासाठी महत्वाचा आहेत.या क्षेत्रात शाश्वत विकासाच्या हमीसाठी जलसंसाधनाचा कार्यक्षम व प्रभावी वापर ,शेतमाल प्रक्रिया क्षमतामध्ये वाढ ,अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचे सक्षमीकरण ,वाया जाणाऱ्या शेती उत्पादनांच्या प्रमाणात घट,अधिक चांगली मूल्य साखळी बाजार व्यवस्था,जमिनीची होणारी धूप व वाळवंटीकरणात आळा घालणे यासाठी उपाययोजना आणि जैवविविधतेचे संरक्षण व त्यात सुधारणा होणे गरजेचे आहे .

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा.पंढरी जी.मोरे, प्रिन्सिपल अरुणराव कलोडे महाविद्यालय नागपूर*

**How to cite this article:**
*मोरे, . पंढरी . जी ., & ठावरी, . विठ्ठल . एन . (2025). कृषी व कृषी पूरक व्यवसायाचे आर्थिक अध्ययन. Journal of Research and Development, 17(9(A)), 59–64.* https://doi.org/10.5281/zenodo.17510270

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.17510270
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

**संशोधनाचा पूर्व आढावा :-**

भारतीय अर्थ व्यवस्थेच्या नीतीचा कृषी व कृषी पूरक व्यवसाय हा एक अविभाज्य भाग आहे.कृषी व कृषिपूरक व्यवसायाच्या विकासासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांचा मागोवा शोध निबंधाच्या माध्यमातूनतपासून प्रस्तुत शोध निबंधाला योग्य दिशा देण्याचे कार्य या आढाव्यातून झालेल्या झाले आहेत.संशोधक वर्तमान समस्येचे अध्ययन करीत असतांना प्रबंध ,पुस्तके ,विविध संदर्भ ग्रंथ तसेच लाघुप्रबंधाचे अध्ययन करण्यात आले.त्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले .अत्यंत महत्वपूर्ण माहिती व मार्गदर्शन घेऊन शोध निबंधाचे कार्य पूर्ण केले .

**डॉ.स्वामीनाथन यांच्या मते :-**

डॉ. स्वामीनाथन ज्यांना हरित क्रांतीचे जनक म्हटले जाते.यांचे कृषी विषयक विचार संपूर्ण भारतासाठी प्रेरणादायी होते.त्यांनी भारतीय कृषी क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे जीवन उंचावण्यासाठी महत्वपूर्ण कार्य केले.त्यांनी हरित क्रांतीच्या माध्यमातून देशातील अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यावर विशेष भर दिला .कृषी क्रांती घडवून आणण्यासाठी उच्च उत्पन्न देणाऱ्या बियाणांचा विकास व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यावर भर दिला.त्याचबरोबर त्यांनी केवळ शेतीचे उत्पादन वाढण्यावर लक्ष केंद्रित केले नाही ते नैसर्गिक संसाधानाचे संरक्षण व शाश्वत शेती करण्यावर जोर दिला.त्यासाठी शेतकऱ्यांचे कसे कल्याण याला प्रथम प्राधान्य दिले . तसेच शेतकऱ्यांसाठी योग्य धोरण ,बाजारपेठांच्या सुधारणा व सिंचनाच्या सुविधा यावर देखील भर दिला.संशोधनाच्या माध्यमातून कृषीमध्ये नवीन तंत्रज्ञान व सुधारणा करण्यासाठी कृषी संशोधनाला खूप महत्व दिले .शेत जमिनीची सुपीकता आणि पाण्याच्या योग्य व्यवस्थापनावर सुध्दा विशेष भर देण्यात आला .त्यामुळे चांगले बियाणे व पाणी यांच्या मदतीने चांगल्या प्रतीच्या उत्पादनाची निर्मिती होऊ लागेल.शेतीमध्ये विविध उपाययोजना करण्यासाठी भारतीय हवामानानुसार विविध बियाणांचा विकास आणि हवामान बदलामुळे होणारे परिणाम यासाठी विशिष्ट प्रयत्न केले.तसेच शेतकऱ्यांनी कृषी तंत्रज्ञाना बद्दल जागरुक असले पाहिजे . त्यासाठी नवीन गोष्टी शेतकऱ्यांना शिकविणे अत्यंत आवश्यक आहे .डॉ.स्वामीनाथन यांनी कृषी क्षेत्रात मोठे बदल घडवून आणले .त्यामुळे आजही प्रत्येक शेतकऱ्यांना प्रेरणादायी ठरत आहे.

**संशोधनाच्या पद्धती :-**

संशोधनांची उद्दिष्ठ्ये संशोधनाकरिता निश्चित केल्यानंतर त्या उध्दिष्टाकरिता संशोधनाचे प्रकार अध्यायनाकरिता निवडण्यात आले आहे.आणि त्यानुसार संशोधन आराखड्याची निवड करण्यात आली आहे.सामजिक संशोधनाच्या अनेक पद्धती असून त्या मिळत्या जुळत्या आहेत.अशा अनेक पद्धतीचा वापर संशोधनासाठी करणे आवश्यक ठरते.त्यामध्ये गुणात्मक ,संख्यात्मक ,ग्रंथालयीन ,प्रयोगात्मक ,क्षेत्रीय अध्ययन ,सर्वेक्षण ,विकासात्मक ,तुलनात्मक ,ऐतिहासिक आणि संरचनात्मक इत्यादी पद्धती महत्वपूर्ण आहे .सामाजिक शास्त्राच्या कोणत्याही विषयात संशोधन करणाऱ्या संशोधकास एक किंवा काहीची निवड आपल्या संशोधनासाठी करावी लागते.प्रस्तुत शोध निबंधात सर्वेक्षण पद्धतीचा वापर प्रमुख असून ऐतिहासिक ,संरचनात्मक,गुणात्मक ,मात्रात्मक पद्धतीचा वापर सोयीनुसार करण्यात आलेला आहे .

**भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी व कृषी पूरक व्यवसायाची आवश्यकता व महत्व :-**

कृषी व कृषी पूरक व्यवसाय भारतीय अर्थव्यवस्थेचा आरसा आहे .२०११ च्या जनगणनेनुसार ६५ ते ६७ टक्के लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.भारतीय अर्थव्यवस्थेत स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात कृषी व कृषी पूरक व्यवसायाचा वाटा २.९ टक्के एवढा आहे .मात्र येणाऱ्या पुढील वर्षात २.८ टक्के राहण्याची शक्यता दर्शविण्यात आली आहे.परंतु स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात कृषी व कृषी पूरक व्यवसायाचा वाटा कमी असल्यामुळे त्यात वृद्धी करणे गरजेचे आहे.भारतीय कृषीचा आकार व कृषी पूरक व्यवसायाची स्थिती बघता विकसित राष्ट्राच्या तुलनेत मागासलेली असल्याचे दिसून येते.तसेच ग्रामीण क्षेत्रात राहणाऱ्या शेतकऱ्यांना कृषी व कृषी पूरक व्यवसायविषयक योग्य ते मार्गदर्शन स्थानिक पातळीवर मिळत नाही.त्यामुळे कृषी व कृषी पूरक व्यावसायापासून कमी उत्पादकता प्राप्त होत असतांना दिसते.त्याची प्रमुख कारणे पुढील प्रमाणे दिसून येते. त्यामध्ये जमिनीचा आकार,जमिऊ व्यवस्था ,लोकसंख्येचा कृषी व कृषीपूरक व्यवसायावरील अतिरिक्त भार,सामजिक रूढी परंपरा व प्रतिकूल वातावरण ,भांडवलाची कमतरता,तांत्रिक मागासलेपणा ,सिंचनाच्या सोयीचा अभाव,बाजाराच्या अपुऱ्या सोयी ,नैसर्गिक कृषी पद्धती या व्यतिरिक्त अनेक समस्या कृषी व कृषी पूरक व्यवसायामध्ये दिसून येते.

**कृषीचा इतिहास** :-

सर्वसाधारणपणे कृषीचा अर्थ निर्वाहासाठी सहेतुकपणे जमिनीतून पिके काढणे होय .इ .स.पू.आठ ते दहा हजार वर्षापेक्षा जुना शेतीचा इतिहास असल्याचे दिसून येते.तत्पूर्वी मानव रानटी अवस्थेत असतांना जंगलातील श्वापदे मारून उदरनिर्वाह करीत होता.त्यानंतर कंदमुळे ,झाडांची फळे,व तृणधान्ये यावर उपजीविका करू लागला.मानव भटक्या अवस्थेत न राहता वसाहती करून राहू लागला. त्याचबरोबर पिकांचे संवर्धन कृत्रिम उपायांनी जमीन नांगरून खते जमिनीस दिल्यास पिक जास्त येते.अशा प्रकारचा शोध त्यांनी लावला आणि कृषी व्यवसाय हा एक निर्वाहाचा व्यवसाय बनला.ख्रि.पू.सु.३००० वर्षापूर्वी इजिप्त आणि बबिलोनिया येथील शेती इतिहासाला माहित असलेली पहिली शेती होय.फ्रांसमधील गुहांमध्ये करण्यात आलेल्या उत्खननावरून पुर्वपाषण युगात मानवाला कृषिविद्या अवगत असल्याचे दिसून येते. प्राचीन काळामध्ये बहुतेक सर्व संस्कृतीचा विकास हा नद्यांच्या काठावर झालेला दिसतो. याचा कारण म्हणजे शेतीपासून भरपूर अन्न प्राप्त होत असे. नाईल,टासग्रीस,सिंधू यासारख्या नद्यांनी माहौ संस्कृतीला जन्म दिला आहे.आणि आधुनिक विज्ञानयुगातही शेती विकासावर मानवी संस्कृतीचा विकास अवलंबून असल्याचे दिसून येते.

रोमन काळामध्ये सुरुवातीला मुख्यत: गहू,जव आणि पुढच्या काळात ओट व द्राक्षे यांचे उत्पादन व्हायचे.खते व द्विदल धान्याचा वापर करून बिवड यांचा प्रसार झाला. तरीही मात्र शेतीची उत्पादनशक्ती कमी होती.मध्ययुगीन युरोपातील शेती ही रोमनकाळातील शेतीपेक्षा मागासलेली होती.संरजामदाराच्या जमिनी भूदासाद्वारे कसल्या जायच्या.आणि कसण्याच्या पद्धती त्रिक्षेत्रीय होत्या.त्यामध्ये शिवाराचे तीन किवा चार भाग असायचे.आणि त्यात प्रत्येक शेतकऱ्याचा हिस्सा एक भाग ठेवून गहू आणि बार्ली किंवा राय यांचे बिवड अशी पद्धती होती.मात्र शेतकऱ्यांना जमिनीचे विखंडन,कसवणूकीबाबत सामुहाचा व परंपरेचा प्रभाव मोठा असल्यामुळे प्रयोग स्वातंत्र्य मिळत नव्हते.

इंग्लंडमध्ये सोळाव्या शतकात कुंपण शेतीची म्हणजे वैयक्तिक शेती करण्याच्या चळवळीला सुरुवात झाली.त्याचे मुख्य कारण म्हणजे लोकरीचा वाढत जाणारा भाव आणि त्यामुळे मेंढपाळी व्यवसायामध्ये येत असलेली बरकत महत्वपूर्ण होती. त्यानंतर समोर अठराव्या शतकामध्ये कुंपनशेती सार्वत्रिक होऊ लागली.आणि त्याचे रूप भांडवलशाही पद्धतीची शेती,मशागतीची सुधारलेली साधने,नवी पिके जनावरांच्या सुधारलेल्या जाती यामध्ये पालटले.

**भारतींय शेतीचा इतिहास :-**

इ.स.पू.दहा हजार हे नव-अश्मयुगाचा काळ म्हणून गणल्या जाते.या काळात मानव रानटी अवस्थेत होता.मात्र शेतीचा विकास नव-अश्म्युगाच्या काळात झालेला आहे.त्या काळातील लोक गाई,बैल,घोडे या सारख्या जनावरांचे पालन पोषण करीत होते.नव-अश्मायुगाच्या काळानंतर ताम्रपाषण काळात लोक शेती करून घरे बांधून स्थायिक झाले. आणि याचा काळात शेती विकसित झाली. तसेच या काळातील लोक इजिप्त,इराण,मेसोपोटोमिया इत्यादी देशात व्यापार करायला लागले.

मोहोन्जोदाडो आणि हडप्पा येथील उत्खाननावरून सिंधू संस्कृती ही नागरी संसृती होती.त्या संस्कृतीतील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून जव,कापूस,तरबुजे,खजूर ,भाजीपाला व फळे इत्यादी पिकांची लागवड करीत होते. त्याचबरोबर गहू ,विविध शेंगा,तीळयासारखे पिक घेता येत होते.मात्र भात शेतीचा पुरावा मिळाला नाही. कापसाची निर्यात त्या काळात मेसोपोटेनिया या देशात करण्यात येत होती.

**स्वातंत्र्योत्तर कालीन कृषी विकास:-**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतामध्ये नियोजनाच्या काळाला सुरुवात झाली.याच काळात पंचवार्षिक योजनेचे पर्व सुरु झाले.या नियोजनाच्या काळात विकासाला चालना देण्यासाठी कृषी विकासाच्या प्रयत्नाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.प्रत्येक पंचवार्षिक योजनेत कृषी वरील खर्चाचे प्रमाण बदलत असे तरी तिच्या विकासाचे उद्दिष्ट नेहमीच दृष्टीसमोर ठेवणे आवश्यक आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी वेगवेगळया प्रयत्नांनी अन्नोत्पादन वाढविणे व इतर कृषी उत्पादन वाढविणे अत्यंत आवश्यक आहे.एकंदरीत देशाच्या वाढत्या लोकसंख्येला अन्नाचा पुरेसा पुरवठा करणे.व्यापारीकरणाच्या दृतीने वाढत्या उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणात कच्च्या मालाचा पुरवठा करणे,देशाच्या वाढत्या रोजगाराबरोबरच अन्नधान्याची मागणी पूर्ण करणे.यासाठी शेतीतील होणारे उत्पन्न वाढविणे अत्यंत आवश्यक होते.तसेच स्वातंत्र्योत्तर काळात जमीनदार,जहांगीरदार इनामदार इत्यादीचे मध्यस्थांचे उच्चाटन करणे,जमीन कसणाऱ्या कुळांना संरक्षण देणे,जमिनीचे मालकी हक्क किंवा कब्जा मिळवून देणे.आणि जमिनीवर कमाल मर्यादा घालणे, वेगवेगळया जमिनीच्या तुकड्याचे संधीकरण करणे इत्यादी विषयक कायदे करण्यात आले.त्याचा फायदा देशामध्ये कृषी उत्पादन वाढण्यासाठी झालेला दिसते.पहिल्या दोन पंचवार्षिक योजनामध्ये ३० लक्ष कुळांना २८ लक्ष हेक्टर एवढ्याजमिनीची मालकी हक्क प्राप्त झाले.त्यापैकी काही कुळे जमिनीचे कसबेदार बनले.जमिनीची सुधारणा ही कसेल त्याची जमीन या तत्वावर झालेली दिसून येते-याचवेळी जमिनीचे कायद्याने एकत्रीकरण झाले.तसेच पाणी पुरवठ्याकडे विशेष लक्ष देण्यात आले.नियोजनाच्या पहिल्या पंधरा वर्षाच्या काळात सुमारे ७५ टक्के जमीन सिंचनाखाली आली. त्यामुळे अन्नत्पादन वाढायला लागले.आणि अन्नोत्पादन वाढविण्यासाठी पहिल्या दोन योजनामध्ये अधिक शेतजमीन लागवडीखाली आणल्या गेली.त्यानंतर कृषी उत्पादन दर हेक्टर वाढायला लागले.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनाच्या काळात सघन कृषी कार्यक्रम काही निवडक जिल्ह्यामध्ये सुरु करण्यात आला.मात्र पहले काही वर्ष सघन कृषी कार्यक्रम निराशाजनक ठरला.त्याचे कारण म्हणजे निवडलेल्या जिल्ह्यामध्ये पाणी पुरवठा हा अनिश्चित स्वरूपाचा होता.त्याचबरोबर सुरुवातीला या कार्यक्रमाद्वारे खतांचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला होता.त्यानंतर अधिक उत्पादन देणाऱ्या बियांणाकडे विशेष लक्ष देण्यात आले.तेव्हा हा कार्यक्रम यशस्वी ठरला.१९६६-६७ या काळात अधिक उत्पादन देणाऱ्या बी-बियाणांचे वाटप मोठ्या प्रमाणात करण्यात आले.तेव्हा धान्योत्पादन वाढायला सुरुवात झाली.१९६४-६५ ते १९७०-७१ या काळात गव्हाचे उत्पादन १४ टक्क्यांने वाढले.आणि दरवर्षी ७.५ टक्के दराने गव्हाचे उत्पादन वाढल्याचे दिसून येते.त्याचबरोबर ज्वारी,मक्का,तांदूळ व बाजरी यांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली.परंतु डाळीच्या उत्पादनात घट झाल्याचे दिसून येते.मात्र चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात कृषी उत्पादनात ५ टक्क्यांनी वाढ व्हावी असे योजनेचे उद्दिष्ट होते.मात्र प्रत्यक्षात यामध्ये ३ टक्क्यांनी वाढ झाली.याचा परिणाम म्हणजे देशाच्या क्षेत्राच्या उत्पादनात असंतुलनाची स्थिती दिसून येते.त्याचबरोबर वेगवेगळया राज्याचा कृषी विकास देखील असंतुलीत असल्याचे दिसते.हे कृषी उत्पादनातील असंतुलन दूर व्हावे.यासाठी कृषी उत्पादन उच्च स्तरावर नेण्यासाठी आणि दर हेक्टरी उत्पादन वाढविण्यासाठी शेती सुधारणेच्या प्रयत्नांकडे विशेष लक्ष देण्यात आले.खरच अधिकाधिक वापर,सुधारित बी-बियाणांची पेरणी,सरकारी संस्थामार्फत शेती करण्यासाठी कर्जाचा तुटवडा इत्यादी सुविधाकडे विशेष लक्ष देण्यात आले.शेतकऱ्यांना

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

शेतीबरोबर कुक्कुटपालन व्यवसाय,दुग्ध व्यवसाय यांचा विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे ठरेल,त्याचबरोबर कृषी व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण झाल्यास कृषी उत्पादन राष्ट्रीय गरजानुसार संतुलित होईल.

शेतजमीन क्षेत्राविषयक माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

| अ.क्र. | धारणगट (हेक्टर) | भूधारक (टक्के) | क्षेत्र (टक्के) |
|---|---|---|---|
| १. | ० ते २ | ६९.५ | ३६.८ |
| २. | २ ते ५ | २२.५ | ३४.५ |
| ३. | ५ ते १० | ७.६ | २४.४ |
| ४. | १० ते २० | ०.४ | ३.१ |
| ५. | २० व त्यापेक्षा जास्त | ०.०५ | १.१ |

२०१५-०१६ च्या कृषी गणनेच्या माहितीनुसार जिल्ह्यात एकूण ३,३३,०५६ भूधारक असून त्यांच्या जवळ एकूण शेतजमीन ५,६५,१२७.६१ हेक्टर एवढी आहे. सन २०१७-०१८ च्या ऋतू व पिक अहवालानुसार ४७१ हजार निव्वड पेरणी क्षेत्र आहे. त्यापैकी ६०४ हजार हेक्टर क्षेत्र लागवडी लायक असून ५०८ हजार हेक्टर पिकाखाली आहे.सन २०१५-०१६ च्या ऋतू व पिक अहवालानुसार ४८८ हजार हेक्टर निव्वळ पेरणी क्षेत्र आहे.त्यापैकी ६५७ हजार हेक्टर क्षेत्र लागवडीलायक असून ५३७ हजार हेक्टर क्षेत्र पिकाखाली आहे.२०१४-०१५ च्या ऋतू व पिक अहवालानुसार ४३७ हजार हेक्टर निव्वळ पेरणी क्षेत्र आहे.त्यापैकी ६६१ हजर हेक्टर क्षेत्र लागवडी लायक असून ५२६.३ हजार हेक्टर क्षेत्र पिकाखाली आहे.२०११-०१२ च्या ऋतू व पिक अहवालानुसार ४७७ हजार हेक्टर निव्वळ पेरणी क्षेत्र आहे.त्यापैकी ४३ हजार हेक्टर क्षेत्र लागवडी लायक असून ५२१ हजार हेक्टर क्षेत्र पिकाखाली आहे.सन २०१७-०१८ मधील जिल्ह्यातील ओलिताखालील क्षेत्र हे एकूण पिकाखालील क्षेत्राच्या २५.४ टक्के आहे.यातील १९.५ टक्के क्षेत्रात पृष्ठभागीय तर ८०.५ टक्के क्षेत्र विहिरीद्वारे केलेले आहे.परंतु कृषी व कृषिपूरक व्यवसायाची स्थिती बघता आजही मागासलेपणा आढळून येतो.म्हणून या व्यवसायाशी सबंधित असणाऱ्यासमस्या लक्षात घेऊन उपाययोजना करणे गरजेचे आहे.या उद्देशाने हा विषय महत्वाचा वाटतो.

**कृषी उत्पादकता आणि उत्पादन :-** भारतातील शेतीत झालेला विकास स्वातंत्र्योत्तर कालखंडात मोजण्याकरिता उत्पादन व उत्पादकतेत झालेला बदल लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे.

कृषी उत्पादकता = विशिष्ट पिकांचे एकूण उत्पादन
विशिष्ट पिकाखालील एकूण जमीन

भारतातील काही पिकांचे निवडक देशांच्या प्रति हेक्टर उत्पादकतेची तुलना पुढीलप्रमाणे करता येईल.

| अ.क्र. | पिकांचे प्रकार | देश | प्रति हेक्टर उत्पादन किलोग्रॅम |
|---|---|---|---|
| १. | तांदूळ | इजिप्त | १७०२ |
| | | भारत | ३५९१ |
| | | जपान | ५३९१ |
| | | चीन | ६७४४ |
| | | अमेरिका | ८३४९ |
| २. | गहू | चीन | ४९९५ |
| | | भारत | ३१७३ |
| | | इराण | १६७१ |
| | | पाकिस्तान | २७१४ |
| | | इजिप्त | ६५१६ |
| ३. | मक्का | अमेरिका | ७७४४ |
| | | फ्रांस | ९००५ |
| | | भारत | २५०५ |
| | | आर्जेन्टिना | ७३४३ |
| | | चीन | ४९४६ |
| ४. | भुईमुग | चीन | ३५७५ |
| | | अमेरिका | ४६९९ |
| | | व्हियतनाम | २१३४ |
| | | भारत | ११७९ |
| | | ब्राजील | ३०८९ |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | ऊस | आर्जेन्टिना | ७१४२९ |
| | | ब्राजील | ७१३०४ |
| | | चीन | ६८८११ |
| | | भारत | ६८३४४ |
| | | इजिप्त | ११४९८३ |

**भारतातील प्रमुख पिकांची संभाव्य व प्रत्यक्ष प्रति हेक्टर उत्पादकता :-**

भारतातील प्रति हेक्टर उत्पादकतेची तुलना केली असता ती इतर देशांच्या तुलनेत कमी असतांना दिसते.परंतु प्रति हेक्टर संभाव्य उत्पादन व प्रत्यक्षातील उत्पादन यातही मोठ्या प्रमाणामध्ये फरक आढळून येतो.ते पुढील तक्त्याच्या माध्यमातून स्पष्ट करता येते.


| पिक प्रकार | संभाव्य उत्पादकता (किलोग्रॅम) | प्रत्यक्ष उत्पादकता(किलोग्रॅम) |
|---|---|---|
| तांदूळ | ४०००-६८९० | २८६२ |
| गहू | ६०००-६८०० | ३११८ |
| ज्वारी | ३०००-४२०० | ६८२ |
| मक्का | ६०००-८००० | २५५२ |
| कापूस | ७००-८६५ | ४८२ |
| ताग /ज्यूट | २५००-३००० | २३५० |
| ऊस | १९६०००-११२००१ | ६६९८८ |

**कृषी पूरक व्यवसाय:-**

शेतीला जोड असलेले आणि त्यातून अधिक उत्पन्न प्राप्त करून देणारे व्यवसाय म्हणजे शेतीपूरक व्यवसाय होय.कृषीला पूरक असणारे व्यवसाय म्हणजे कृषी पूरक व्यवसाय होय.या पूरक व्यवसायामध्ये कुकुटपालन,दुग्ध पालन शेळीपालन ,मत्स्यपालन ,मधुमखी पालन अन्न प्रक्रिया इत्यादी व्यवसायाचा समावेश होत असतो. हे पूरक व्यवसाय शेतकऱ्यांना त्याच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी महत्वपूर्ण कार्य करते. तसेच शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी कृषी पूरक व्यवसाय महत्वाची भूमिका बजावते.त्यामुळे देशामध्ये उपलब्ध असणारे पशुधन हे शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीसाठी महत्वाचे कार्य करते.शेतकरी हा दारिद्र अवस्थेत जीवन जगत असतांना त्यांच्या कौटुंबिक उत्पन्नात वाढ करण्यासाठी मदत कृषिपूरक व्यवसाय करीत असते.भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून कृषी पूरक व्यवसाय हा देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात महत्वपूर्ण कार्य करते.आणि या कृषी पूरक व्यवसायाद्वारे होणारे उत्पादन पुढील ताक्त्याद्वारे स्पष्ट करता येते.

| व्यवसायाचे प्रकार | सुरुवातीचा खर्च(रु) | वार्षिक नफा (रु) | भागधारक संख्या |
|---|---|---|---|
| दुग्ध व्यवसाय | ५०,००० | ८०,००० | १२० |
| कुकुट पालन | ३०,००० | ६०,००० | ९० |
| शेळी पालन | ४०,००० | ७०,००० | ६० |
| मधुमखी पालन | २०,००० | ४५,००० | ३० |
| अन्न प्रक्रिया | ६०,००० | १,००००० | ५० |

ग्राफ : वार्षिक नफ्याच्या आधारे कृषी पूरक व्यवसाय



Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

**मूल्यमापन :-**

कृषी व कृषीपूरक व्यवसाय भारतातील अर्थव्यवस्थेचा आरसा आहे.२०११ च्या जनगणनेनुसार ६५ ते ६७ टक्के लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.भारतीय अर्थव्यवस्थेत स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात कृषी व कृषी पूरक व्यवसायाचा वाटा २.९ टक्के एवढा आहे.मात्र येणाऱ्या पुढील वर्षात २.८ टक्के राहण्याची शक्यता दर्शविण्यात आली आहे.परंतु स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात कृषी व कृषी पूरक व्यवसायचा वाट कमी असल्यामुळे त्यात वृद्धी करणे गरजेचे आहे.भारतीय कृषीचा आकार व कृषी पूरक व्यवसायाची स्थिती बघता विकसित राष्ट्राच्या तुलनेत मागासलेली असल्याचे दिसून येते.तसेच ग्रामीण क्षेत्रात राहणाऱ्या शेतकऱ्यांना कृषी व कृषी पूरक व्यवसायविषयक योग्य ते मार्गदर्शन स्थानिक पातळीवर मिळत नाही.त्यामुळे कृषी व कृषिपूरक व्यवसायापासून कमी उत्पादकता प्राप्त होत असतांना दिसते.

**संदर्भग्रंथ सूची**

1. डॉ.प्रदीप आगलावे, ,सामाजिक संशोधन पध्दती, विद्या प्रकाशन,नागपूर
2. डॉ.पू.ल.भांडारकर, सामाजिक संशोधन पध्दती,मंगेश प्रकाशन,नागपूर
3. डॉ.स.श्री.देसाई,सौ.निर्मला भालेराव,भारतीय अर्थव्यवस्था,निराली प्रकाशन पुणे
4. डॉ.विजय काविमंडन, कृषी अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन,नागपूर
5. डॉ..स.श्री.देसाई,सौ.निर्मला भालेराव,कृषी अर्थशास्त्र व भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन पुणे
6. कुलकर्णी बी.डी.आणि ढेमढेरे,एस.व्ही.अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती,डायमंड पब्लिकेशन,पुणे -२०११
7. कऱ्हाडे बी.एस.शास्त्रीय संशोधन पद्धती,पिंपळापुरे अंड कं.पब्लिकेशन-२०१०
8. कुंजीर,शेती विकास परिसर,विजया प्रकाशन-२००८
9. जारले एल. सामाजिक शास्त्राची संशोधन प्रणाली, अद्वैत प्रकाशन,गजानन पेठ अकोला -२००८
10. देशपांडे श्री.आ आणि देशपांडे वी.श्री.भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) हिमालया पब्लिकेशन,नागपूर -२०१०
11. बोबडे म.वि. भारताच्या ग्रामीण विकासातील शेती क्षेत्राची वाटचाल,अर्थसंवाद,मराठी अर्थशास्त्र परिषद पुणे-२०१५
12. शरद जोशी,शेतकरी संघटना विचार आणि कार्यपद्धती,जनशक्ती बुक्स अंड पब्लिकेशन-२०१८
13. दत्त रुद्र,सुंदरम के.पी.एस.भारतीय अर्थव्यवस्था.एस.चंद्र पब्लिकेशन दिल्ली -२००५
14. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी-२०१०-०११ ते २०१९-०२०
15. कृषी विद्यापीठ अहवाल
16. राज्य शासनाद्वारे प्रकाशित अहवाल
17. अर्थ व संख्याकीय अहवाल
18. मिश्रा ,पुरी,भारतीय अर्थव्यवस्था-२०१४